# जिल्ह्यासह महाराष्ट्रात खळबळ

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीदिनी परळी महिला नगराध्यक्षांनी काळे कपडे परिधान करून केले अभिवादन

## दलित समाजासह इतर समाजात प्रचंड रोष; जाणून बुजून की..?



बीड (सरकार): भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार तथा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती भारतातच नव्हे तर इतर देशातही आनंदोत्सवाने पारंपारीक पद्धतीने मोठ मोठे वाद्य वाजवून, नाचून गाऊन व विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरी केली जाते. मात्र बीड जिल्ह्यातील परळीमध्ये काल एक गंभीर प्रकार समोर आला आहे. महिला नगराध्यक्ष असलेल्या पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला काळे कपडे घालून अभिवादन केले. मात्र असे कुठेही प्रकार होत नाही. एवढेच नव्हे तर कोणताही भारतीय महापुरूषांची जयंती असो, सण असो, ईद असो या कार्यक्रमातून कुठेही काळे कपडे परिधान करून हा उत्सव साजरा केला जात नाही. मात्र परळीच्या महिला नगराध्यक्षांनी हा केलेला गंभीर प्रकार दलित समाजासह डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानणाऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. यापूर्वीही एका कार्यक्रमातून केतकी नावाच्या महिलेने अपशब्द वापरले होते आणि त्यावर कसलीही प्रतिक्रिया न देता हा कार्यक्रम राबविला होता.त्यामुळे जाणून बजून की काय हा केलेला प्रकार तर नाही ना असा प्रश्न दलित समाजामध्ये निर्माण होत आहे. त्यामुळे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानणाऱ्या नेत्यांनी जिल्हा प्रशासनाने एवढेच नव्हे तर पोलीस प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन तात्काळ कारवाई करावी अशी चर्चा सर्वत्र होत आहे.एवढेच नव्हे तर सोशल मिडीयावरही या संदर्भात अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. एकीकडे आ.धनंजय मुंडे परळी मतदारसंघात चांगले काम करत आहेत. त्याच बरोबर स्थानिक स्वराज्य संस्था असेल किंवा इतर माध्यमातून परळी मतदारसंघातील जनतेसाठी जनतेचे प्रश्न सोडविण्याबरोबर त्यांचा विकास व्हावा याच बरोबर सर्व जाती धर्माने एकत्र येऊन सर्व सण उत्सव साजरे करावे. मात्र दुसरीकडे एका महिला नगराध्यक्षांकडून असा गंभीर प्रकार होत असेल तर या संदर्भात याची गांभीर्याने दखल घेतली पाहीजे अशी चर्चा होत आहे.

बीड: बीड जिल्ह्याच्या परळी येथील नगर परिषदेच्या नगर अध्यक्ष यांनी काळे कपडे परिधान करून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त त्यांना अभिवादन केले..

महामानवाला वंदन करण्यासाठी जगातील अनेक देशात हा भिमजयंती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो.. मात्र कोणीच महापुरुषांना वंदन करताना काळे कपडे घालून असे वंदन करत नाही.. आणि परळी येथील प्रथम नागरिक म्हणून ज्यांची मतदानातून निवड झाली आहे अश्या पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी चक्क काळे कपडे परिधान करून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले..या वरून आता समाज माध्यमावर मोठ्याप्रमाणात त्यांनी परिधान केलेल्या कपड्यांची आता जोरदार चर्चा होताना दिसून येत आहेत तर अनेक तर्क वितर्क देखील लावले जात असल्याचं देखील बोलले जात आहे. परळी नगरीच्या प्रथम नागरिक या नात्यांनी त्यानि महामावानवाच्य जयंतीचा एका प्रकारे निषेध केला असल्याचे बोलले जात आहे. आणि यासह अनेक कॉमेंट देखील येत असल्याचे पहावयास मिळत आहे.


beedsarkar

संपादक–आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १४६ ■ बुधवार १५ एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१६ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 146 ■ Wednesday 15 April 2026 ■RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्र.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


# म्हाळसजवळ्यात तरुणाला सात जणांची काठ्या,कुऱ्हाडीने गंभीर मारहाण

## माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडेसह सात जणांविरोधात गुन्हा दाखल



बीड (सरकार) बीड जिल्ह्यात गुन्हेगारी काही केल्या आटोक्यात येत नसल्याचेच चित्र आहे. अशातच बीडच्या म्हाळसजवळा या गावात एका तरुणाला सात जणांनी काठ्या, कुऱ्हाडीने गंभीर मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणात शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्यासह सात जणांविरोधात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या या घटनेचा अधिक तपास पोलीस करत असून या घटनेनं जिल्ह्यातील गुन्हेगारीचा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात प्रभाकर खांडे असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याच्यावर सध्या बीडच्या जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे. प्रभाकर खांडे याच्या भावाबरोबर कुंडलिक खांडे आणि त्याच्या साथीदारांचे यापूर्वी वाद झाले होते. त्यातून गुन्हा नोंदवण्यात आला होता. हाच गुन्हा मागे घेण्यासाठी हा हल्ला झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. दरम्यान आरोपींनी यापूर्वी ज्ञानेश्वर खांडे यांच्यावर देखील हल्ला केला होता. त्यानंतर आता प्रभाकर खांडे यांच्यावर हल्ला झाल्याने खांडे कुटुंब दहशतीखाली असून आम्हाला गाव सोडावे लागते की काय? अशी भीती ज्ञानेश्वर खांडे यांनी व्यक्त केली. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.



# आ.सुरेश धसांनी मागणी करताच

## सीना प्रकल्पातून पाणी सोडले, ग्रामस्थांकडून आभार व्यक्त

आष्टी (सरकार) आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर आमदार सुरेश धस यांनी पत्राद्वारे मागणी करताच यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे.



आमदार सुरेश धस या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आष्टी मतदारसंघात आमदार सुरेश धस यांनी कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा येथील कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील पिंपरी (घुमरी), कानडी बुद्रुक आणि वाकी या तीन





बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवून शेती सिंचनासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली.

प्रत्यक्ष उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने लाभक्षेत्रातील पिकांना मोठा आधार मिळणार असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी आमदार सुरेश झ यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. ''योग्य वेळी पाणी मिळाल्यामुळे आमची मोठी चिंता दूर झाली,'' अशा भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आल्या.याबाबत आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, ''शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. भविष्यातही त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे.'' दरम्यान, प्रशासनाकडूनही या भागातील पाणीपुरवठा सुरळीत व नियोजनबद्ध ठेवण्यासाठी विशेष लक्ष दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले.


# शेतकऱ्याने मृत्युला कवटाळले, पोस्टमार्टमसाठी नातेवाईक दोन तास ताटकळले

बीड (सरकार): ५२ वर्षीय शेतकरी लक्ष्मण भानुदास क्षीरसागर यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली. मंगळवारी (१४ एप्रिल) दुपारी २ वाजेच्या सुमारास त्यांनी स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आयुष्य संपवले. बीड तालुक्यातील बोरखेड येथे ही घटना घडली. त्यांचा मृतदेह लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला, पण नातेवाईकांना शवविच्छेदनासाठी दोन तास ताटकळत उभे राहावे लागले.

लक्ष्मण क्षीरसागर यांच्यावर कर्ज होते अशी माहिती मिळाली. कर्जामुळे ते गेल्या काही दिवसांपासून विवंचनेत होते. मंगळवारी दुपारी त्यांनी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतला.घटनेची माहिती मिळताच लिंबागणेश पोलीस ठाण्याचे कर्मचारी गणेश परझने, मन्सूर शेख व अविनाश घुंगरड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवला. लिंबागणेश आरोग्य केंद्रात शवविच्छेदनाची



सोय नसल्याचा प्रकार वारंवार घडत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. मृतदेह आरोग्य केंद्रात आणल्यानंतर तिथे शवविच्छेदनासाठी आवश्यक साधनसामग्री आणि कर्मचारीच उपलब्ध नसल्याचे समोर आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांनी मृतदेह नेकनूर येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. या सर्व गोंधळात आणि कागदी प्रक्रियेत दोन तास विलंब झाल्याने मयताचे नातेवाईक रामदास क्षीरसागर, नवनाथ क्षीरसागर, दशरथ क्षीरसागर आणि सरपंच सुनील अनपट यांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी ''अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांत कर्मचाऱ्यांची व साहित्याची कमतरता आहे'', अशी कबुली दिली. अखेर नेकनूर येथे शवविच्छेदन करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतकरी आत्महत्या सारखी संवेदनशील घटना घडल्यानंतरही आरोग्य प्रशासनाची ही असंवेदनशीलता पाहून बीड जिल्ह्यात संताप व्यक्त होत आहे. संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी बोरखेड ग्रामस्थांनी केली आहे.





# आदित्य ठाकरे कार्याध्यक्ष होण्याचे संकेत ; लवकरच होणार घोषणा

मुंबई (सरकार): आधी विधानसभा निवडणुकीत बसलेला धक्का आणि नंतर झालेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत सत्ता राखण्यात आलेल्या अपयशानंतर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पक्षसंघटनेत प्राण फुंकण्यासाठी युवा नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वर्धापन दिन १९ जून रोजी होणार आहे. या वर्धापन दिनी आदित्य ठाकरे यांची पक्षाचे कार्याध्यक्ष म्हणून घोषणा केली जाऊ शकते.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या आमदार आणि खासदारांसह बंड करत वेगळी वाट निवडल्यानंतर उद्धव ठाकरे यांना मोठा राजकीय फटका बसला. शिवसेनेत उभी फूट पडली आणि पक्षाचं नाव आणि चिन्हही ठाकरे यांच्यापासून दूर गेलं. पक्षफुटीनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत ठाकरेंना चांगलं यश मिळालं. मात्र नंतर विधानसभा निवडणुकीत पक्षाची झालेली सुमार कामगिरी आणि मुंबई महानगरपालिकेत पुन्हा सत्ता खेचून आणण्यात आलेल्या अपयशामुळे पक्षसंघटनेत मरगळ आल्याची स्थिती आहे.

## संपादकीय

# एक होती आशा...

'मेलडी क्वीन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या गायिका आणि विख्यात मंगेशकर कुटुंबातील कनिष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाने चित्रपट संगीताचा श्वास थांबला.

मंगेशकर भगिनींचा जन्म सांगलीचा. दीनानाथ मंगेशकर हे त्यांचे वडील. त्यांच्या पश्चात लतादीदींनी संगीत क्षेत्रात पाऊल टाकले. त्यानंतर आशा ताईंचे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीत आगमन झालं. लता दीदी म्हणजे हिंदी चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं सोनेरी स्वप्न होतं तर आशाताई म्हणजे त्याच चित्रपट संगीतसृष्टीला पडलेलं रूपेरी स्वप्न. आशाताईंनी १२ हजार गाणी गायिली. जवळजवळ प्रत्येक गीत हिट या गणतीत जाणारे होते. लता दीदी असोत की आशाताई या दोघींनी जीवनाची प्रदीर्घ वर्षे चित्रपट संगीतसृष्टीत सर्वोच्च स्थान पटकावले. आशा ताईंचा आवाज चिरकाल टिकणारा होता. लता दीदींनी उडत्या चालीची गाणी फार गायिली नाहीत. पण आशाताई उडत्या चालीच्य गाण्यांसाठी, कॅबरे आणि नृत्यगीतांसाठीच प्रसिद्ध होत्या. त्यांनी गीतातील शब्दांशी कधी तडजोड केली नाही. जेव्हा शब्द त्यांना खटकत तेव्हा त्यांनी ते गीतकाराकडून बदलून घेतले. याबाबतीत गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी आशाताईंसाठी लिहीलेले 'पिया तू अब तो आजा' हे गाणे उदाहरणादाखल द्यावं लागेल. यातील शब्द आशाताईंना खटकले तेव्हा मजरूहजींना सांगून त्यांनी ते बदलून घेतलं. तरीही ते गाणे आज आशाताईंच्या गाण्यातील सर्वात गाजलेले गाणे म्हणून गणले जाते. या गीताला त्यावेळी आकाशवाणीवर काही दिवस बंदी होती.

आशा ताईंनी दोन विवाह केले. गणपतराव भोसले हे त्यांचे पहिले पती, तर संगीतकार आर.डी.बर्मन हे दुसरे. त्यापैकी गणपतराव भोसले यांच्याशी विवाह केल्यावर काही काळातच त्यांचा घटस्फोट झाला. पण संगीतकार आरडी बर्मन यांच्याशी त्यांचे संगीत आणि जीवनाचे घट्ट सूर जुळले होते. बर्मन आणि आशाताईंनी अनेक ब्लॉकबस्टर गाणी दिली आणि त्यापैकी अनेक गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहे. त्यांचं चकाकणारं स्टारडम सगळ्यांनी पाहिलं. मात्र त्यांच्या वेदना कुणालाच दिसल्या नाही. त्यांचं आयुष्य केवळ प्रसिद्धी आणि सुरांनीच सजलेलं नव्हतं, तर त्यामागे वेदना आणि संघर्षाचा एक मोठा काळ होता. आशा भोसले यांनी त्यांच्या जीवनावर आधारित बायोग्राफीमध्ये पहिल्या लग्नात झालेला छळ आणि त्यांनी केलेल्या आत्महत्येच्या प्रयत्नाबाबत अत्यंत धक्कादायक खुलासे केले आहेत. त्यांना एकूण तीन मुलं होती. यात एक मुलगी आणि दोन मुलांचा समावेश होता. दुर्दैवाने, नियतीने त्यांच्यावर अनेक आघात केले. त्यांची मुलगी वर्षा, जी पत्रकार होती, तिने आत्महत्या केली. तर मुलगा हेमंत भोसले यांचे कॅन्सरसारख्या आजाराने निधन झाले. इतकं दुःख पचवून आशाताई पुन्हा उभ्या राहिल्या. आशा भोसले यांचा संगीतकार ओ. पी. नय्यर आणि आर. डी. बर्मन यांच्याशी असलेला सांगीतिक प्रवास भारतीय चित्रपटसृष्टीतील सुवर्णपान आहे. नय्यर साहेबांनी आशाताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखून अनेक सुपरहिट गाणी दिली. त्यांनी १२ हजारांहून अधिक गाणी गायली असून, सर्वाधिक गाण्यांचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.आशा भोसले यांनी 'उमराव जान' सारख्या चित्रपटातील भावपूर्ण गझलांना आवाज देण्यासोबतच, हिंदी चित्रपटसृष्टीत अनेक आयकॉनिक कॅबरे आणि डान्स नंबर्स (उदा. 'दम मारो दम', 'पिंजरावाली आया') गायली. त्यांच्या आवाजातील अष्टपैलुत्वामुळे हे कॅबरे गाणे त्यांच्या ओळखीचा एक मोठा भाग बनले, ज्यामुळे त्यांना 'कॅबरे क्वीन' म्हणूनही ओळखले जाऊ लागले.

आशा ताई यांचे घर संगीताच्या वातावरणाने ओतप्रोत भरलेले होते. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे एक अत्यंत प्रसिद्ध मराठी नाट्यसंगीतकार, शास्त्रीय गायक आणि अभिनेते होते. दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून मिळालेल्या शास्त्रीय संगीताच्या प्रेरणेने त्यांनी आपले गायन कौशल्य विकसित केले. त्यांनी आठ दशकांहून अधिक काळ गायन केले. हिंदी आणि मराठीसह अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहे. त्यांना पद्मविभूषण, दादासाहेब फाळके आणि अनेक फिल्मफेअर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.पिंजरा, दम मारो दम, ये मेरा दिल आणि इतर अनेक प्रसिद्ध गाण्यांनी त्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केले. त्यांनी वडिलांचे शास्त्रीय संगीत गाण्याचा वारसा पुढे चालू ठेवला आणि स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. आशा भोसले आणि लता मंगेशकर यांच्यातील संबंधांबद्दल अनेक वर्षे चर्चा आणि तर्कवितर्क लढवले गेले. मनोरंजन विश्वात अशा चर्चा होत्या की दोन दिग्गज गायिका एकाच घरात असल्याने त्यांच्यात व्यावसायिक असूया असू शकते. लता मंगेशकर यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला होता. त्यांनी स्पष्ट केले होते की, त्यांच्यात कोणतीही कटुता नाही आणि आशा भोसले या त्यांच्या धाकट्या बहिण आहेत. त्यांचे आपापसात उत्तम संबंध आहेत. त्यानंतर कुणीही ती चर्चा करण्याची हिमत केली नाही. आशाताई लतादीदींना गुरूस्थानी मानत.

आशाताई आणि लता दीदी या भारतीय चित्रपट सृष्टीतील दोन सर्वात दिग्गज गायिका. हे नाते केवळ व्यावसायिक स्पर्धा नव्हते, तर ते बहिणींमधील एक भावनिक नाते होते. चित्रपट सृष्टीतील काही लोकांनी त्यांच्यात गैरसमज पसरवून दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे आशा ताईंनी एका मुलाखतीत कबूल केले होते. लोक अनेकदा चुकीच्या गोष्टी सांगून तणाव निर्माण करत, पण रक्त हे पाण्यापेक्षा जास्त गडद असते असे सांगून आशा ताई यांनी या बातम्या फेटाळून लावल्या होत्या.अनेक दशकांचा प्रवास, व्यावसायिक स्पर्धा आणि वैयक्तिक आयुष्यातील वादळानंतरही, त्यांचे नाते अखेरपर्यंत टिकून राहिले. आशा ताईंनी गायलेल्या गाण्यांमधील चालींमध्ये एक प्रकारची नजाकत होती. या चालींना आशाताईंच्या सोनेरी आवाजाचा परिस स्पर्श होता. आशा ताई यांनी संगीताच्या क्षेत्रात अष्टपैलुत्व गाजवले आहे. गझलांपासून ते पॉप संगीतापर्यंत आणि भावपूर्ण गीतांपासून ते भजनापर्यंत अनेक प्रकार हाताळले. २०११ मध्ये दिग्गज गायिका आशा भोसले यांची 'सर्वाधिक रेकॉर्डेड गायिका' म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये अधिकृत नोंद करण्यात आली.११,००० हून अधिक एकल, युगल आणि कोरस गाणी रेकॉर्ड केल्याबद्दल त्यांना हा बहुमान लंडनमध्ये देण्यात आला होता. आशा ताईंची नोदं क्वीन ऑफ इंडी पॉप आणि टाईमलेस आवाजाच्या मलिका अशी केली जाईल. आशाताईंना विनम्र अभिवादन!

# बालकांचे हक्क




प्रत्येक बालक हे वेगळे असते म्हणून प्रत्येक बालकाचा आयसीपी अभ्यासपूर्ण पद्धतीने करून घ्यावा लागतो. त्यानुसार बालकावर काम होते. एसआयआर याचे देखील निर्णय प्रक्रियेत विशेष महत्त्व असते. बालक हे बिंदुस्थानी असून बालकाच्या संपूर्ण हिताचा विचार करून बालकासाठी निर्णय घ्यावा लागतो.समिती अध्यक्ष म्हणून असे असंख्य बालक समोर येतात आणि त्याचा अभ्यास करण्याची त्या बालकाच्या पुनर्वसनासाठी काही तरी करण्याची संधी मिळते.बालक त्याचे हक्क आणि समाज, शासन यांची भूमिका समजून घेत आपण हा विषय हाताळणार आहोत.

बाल कल्याण समिती अध्यक्ष पुणे ही जबाबदारी पार पाडताना प्रकियेनुसार अनेक बालके माझ्यासमोर येतात. बालन्याय (काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ व २०१८ अधिनियम ३१(२) अन्वये काळजी संरक्षणसाठी प्रस्तुत होणारी बालके पीडित असतात. असुरक्षित असतात, शारीरिक मानसिक भावनिक आघात त्या बालकांवर झालेला असतो. ही बालके अनाथ असतात एक पालक असणारी असतात, रस्त्यावर राहणारी असतात, लैंगिक अचाचार पीडित असतात, बाल कामगार, बाल विवाह या कुप्रथेला बळी पडलेली बालके असतात, कुठल्या तरी कारणाने घरून निघून गेलेली बालके असतात. ही बालके पोलिसांकडून समिती पुढे प्रस्तूत होतात. युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द राईट्स ऑफ द चाइल्ड णछउठउ हा एक मार्कर दस्तऐवज आहे जो मुलांची विशिष्ट संवेदनशीलता आणि गरजा ओळखतो आणि त्यांचे कल्याण, विकास आणि बाल हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतो. आम्ही वचनबद्ध केलेल्या आंतरराष्ट्रीय करारांसह आपल्या राष्ट्राचे शासन करणारी कायदेशीर चौकट, निकष आणि अधिकारांचा संच स्थापित करते. भारतीय संविधानाने विशेषत: लहान मुलांवर विशेष भर देऊन काही अधिकार दिले आहेत. भारताचे समान नागरिक या नात्याने बालकांना अनेक मूलभूत अधिकार आहेत. जे प्रौढ पुरुष किंवा महिलांनी उपभोगले आहेत. अस्तित्वात असलेल्या कोणत्याही मर्यादा असूनही, हे अधिकार सार्वत्रिक आहेत आणि प्रत्येकासाठी लागू आहेत.

**बाळाचे पुनर्वसन : सुरक्षित मार्ग बाल कामगार**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात इतर राज्यातून बालके काम करण्यासाठी पाठवली जातात. ही बालके रेल्वे पोलिसांकडून ेशिलींश केली जातात आणि समिती पुढे प्रस्तुत केली जातात. बालक त्यांच्या नातेवाईकांकडे पाठवली जातात त्यामुळे बालकं कामासाठी आली आहेत याचे पुरावे मिळणं अवघड असते. कामाच्या ठिकाणी ती घरचीच बालके आहेत असं सांगितलं जातं. या बालकांना सुरक्षित केलं जातं. प्रत्येक बालकांची वेगळी कहाणी असते. वेगळी परिस्थिती असते. ही बालके कामासाठी का पाठवली जातात? ही चर्चा आपण लेखाच्या माध्यमातून करणार आहोतच. भारतातील मुलांचे लक्षणीय प्रमाण बालमजुरीमध्ये गुंतलेले आहे. २०११ मध्ये भारताच्या राष्ट्रीय जनगणनेत असे आढळून आले की, त्या वयोगटातील एकूण २५९.६४ दशलक्ष मुलांपैकी ५-१४ वयोगटातील बालकामगारांची संख्या १०.१२ दशलक्ष इतकी आहे. बालमजुरीची समस्या भारतासाठी एकमेव नाही; जगभरात, सुमारे २१७ दशलक्ष मुले काम करतात. बाल आणि किशोरवयीन कामगार कायदा, १९८६ , २०१६ मध्ये सुधारितनुसार , मूल ची व्याख्या १४ वर्षांपेक्षा कमी वयाची कोणतीही व्यक्ती म्हणून केली जाते आणि सीएलपीआर कायदा मुलाच्या कामावर बंदी घालतो.

**बालविवाह :** बालक-बालिका कुटुंब समाज सगळे बाल विवाह सारख्या कु प्रथेचे गंभीर परिणाम भोगतात.किती बालकांचे आयुष्य होरपळून निघते.नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार महाराष्ट्रात गेल्या १२ ते १३ वर्षांत २ कोटी बालविवाह झालेत. बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ समाजातील बालविवाहांचे उच्चाटन करण्यासाठी, भारत सरकारने बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ लागू केला आणि बालविवाह प्रतिबंध कायदा, १९२९ चे पूर्वीचे कायदे रद्द केले. हा कायदा बालविवाह प्रतिबंधित करण्यासाठी सक्षम तरतुदींसह सशस्त्र आहे. प्रत्येक पातळीवर बाल विवाह थांबण्याची मोहीम आखलेली असतेच.

अंगणवाडी ताई यांना गावातील प्रत्येक घरची परिस्थिती माहिती असते. म्हणून अंगणवाडी ताई गावातील प्रत्येक मुल त्याची प्रगती, त्याचे भविष्य याच्याशी भावनिक रित्या जोडलेली असते. म्हणून अंगणवाडी ताईवर बाल विवाह घडू न देण्याची मोठी जवाबदारी असते. प्रत्येक घर प्रत्येक मुलं ताईच्या जिव्हाळ्याचे असते त्यांचे भविष्य करपू नये यासाठी ती केंद्र सरकारने बालविवाह प्रतिबंधक शपथ घ्यावी अशी सूचना केली आहे, ही शपथ कायम आपल्या स्मरणात राहावी आणि कृतीत यावी यासाठी आपण कटिबद्ध आहोत.बाल विवाह मुक्त भारत ही मोहीम आपण सगळे मिळून यशस्वी करू या. प्रतिबंधात्मक उपाय, कुटुंब सक्षमीकरण, बालकांचे शैक्षणिक, कौटुंबिक, पुनर्वसन यासाठी ठोस प्रयत्न करू आणि बालक सुरक्षित भारत निर्माण करण्यास आपला सिंहाचा वाटा देऊ. आजच्या परिस्थितीत आपल्या निदर्शनास येते की सराईत गुन्हेगार बालकांना आपल्या गुन्हेगारी विश्वात सहभागी करून घेत आहेत.बालकांच्या वापर करून त्यांच्या माध्यमातून गुन्हे घडवले जात आहेत.ही बालके काळजी संरक्षणाची बालके असतात.अशी बालके जर आधीच सुरक्षित केली गेली, तर ही बालके विधी संघर्षित बालक होण्यापासून वाचवली जाऊ शकतात. या बाबत जन जागृती आणि योग्य माहितीचा प्रसार होणे आवश्यक आहे.

# लसूण आणि मधाचे चमत्कारिक फायदे

**- रोज सकाळी रिकाम्या पोटी सेवन करणे ठरते फायदेशीर** आयुर्वेदानुसार, जर तुम्ही वाढत्या कोलेस्ट्रॉलनं त्रस्त असाल तर लसणाच्या कच्च्या पाकळ्याचं सेवन करणं फायदेशीर मानलं जातं. लसणात 'एलिसिन' नावाचं गुणकारी घटक असतं. हे एक प्रकारचं नैसर्गिक प्रतिजैविक आणि अँटीऑक्सिडंट असून याचं सेवन केल्यानं शरीरातील रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. तसेच, यामुळे रक्तही जाड होत नाही. लसणामध्ये असलेलं सल्फर आणि इतर रसायने लसणाला बॅक्टेरियाविरोधी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म



प्रदान करतात.

तसेच, मध हा निसर्गाचा एक अनमोल ठेवा असून मधुमेह असलेल्या व्यक्तींवरही मधाचा फारसा परिणाम होत नाही. यामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलिफेनोल्स हे दोन महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे, शरीरातील खाज, लालसरपणा कमी होण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत होते. मधामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीफंगल गुणधर्म विविध आजारांशी लढण्यासाठी अंत्यत उपयुक्त ठरतात.लसूण आणि मध या दोन्ही मिश्रणांना आपल्या शरीरासाठी अमृत मानलं जातं. हे दोन्ही मिश्रण श्वसनाचे आजार, संसर्ग, त्वचा रोग, हृदयविकार आणि पोटासंबधित समस्यांवर अत्यंत प्रभावी ठरतात. यामुळे सर्दी, खोकला आणि तापाची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच, रक्त पातळ होऊन 'स्ट्रोक'चा धोका कमी होतो. याबरोबरच उच्च रक्तदाब, संधिवात, दातदुखी आणि बद्धकोष्ठतेसाठीही हे अत्यंत गुणकारी मानलं जातं. त्यामुळे या दोन्ही मिश्रणाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.

**असे तयार करा लसूण आणि मधाचे चमत्कारिक मिश्रण :** एका स्वच्छ काचेच्या बरणीत ताज्या लसणाच्या पाकळ्या सोलून टाका. त्यात शुद्ध मध घालून बरणी पूर्ण भरा. ५ ते ७ दिवस हे मिश्रण तसेच राहू द्या (मिश्रण छान मुरू द्या) त्यानंतर दररोज सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा.

# दही आणि ताक पोटाच्या आरोग्यासाठी भारी

उन्हाळ्याचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे अनेकजण उन्हाळ्यात दही आणि ताक घेणं पसंत करतात.

उन्हाळ्याची सुरुवात होताच बऱ्याच घरांमध्ये जेवताना नियमितपणे दही किंवा ताकाचं सेवनं करतात. या दोन्ही पदार्थांमध्ये प्रोबायोटीक्स अर्थात पोटासाठी फायदेशीर ठरणारे बॅक्टेरिया असतात. मात्र, फार कमी लोकांना हे माहित आहे की यापैकी आपल्या पोटाच्या आरोग्यासाठी नेमकं काय फायदेशीर आहे? चला तर जाणून घेऊयात दही आणि ताक या दोन्हींपैकी नक्की काय फायदेशीर ठरेल याबद्दल. दह्यात प्रोटीन आणि व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. जर तुम्हाला वजन वाढवायचं असेल किंवा हाडे मजबूत करायची असतील, तर दही उत्तम आहे. आयुर्वेदानुसार, दही हे निसर्गात उष्ण प्रवृत्तीचं मानलं जातं. दही खाल्यानंतर पोटातील उष्णतेमुळे त्याचे आंबवण्याचे कार्य वाढते, ज्यामुळे काही लोकांना सिडिटी किंवा पोट फुगणे यांसारख्या समस्या उद्भवतात. दहीमध्ये ऊर्जेचं स्तोत्र मोठ्या प्रमाणात असतं. पण हे पचनासाठी जड मानलं जातं. जर तुम्हाला दही खायचे असेल, तर ते दुपारच्या जेवणात खावं. रात्री दही खाणं टाळावं, कारण यामुळे कफ वाढण्याची शक्यता असते. ताक हे दह्यापासून बनवलं जातं. पण त्यामध्ये पाणी मिसळ्यामुळे आणि घुसळ्यामुळे त्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात. आयुर्वेदात ताकाला 'तक्र' म्हटलं जातं, ज्याची तुलना अमृताशी केली गेली आहे. दह्याच्या विरुद्ध, ताक हे निसर्गात अत्यंत शीत अर्थात थंड असतं. हे शरीराचं तापमान त्वरित कमी करण्यास मदत करतं आणि ताक पचायलाही हलकं असतं. जर तुम्हाला अपचन, गॅस किंवा सिडिटीचा त्रास असेल, तर ताक हे सर्वोत्तम पेय आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स घामाद्वारे बाहेर पडतात. ताक प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा दूर होण्यास मदत मिळते.उन्हाळ्यात दह्यापेक्षा ताक पिणं जास्त फायदेशीर ठरतं. दही हे पचायला जड असल्यानं उन्हाळ्यात पचनशक्ती मंदावलेली असताना ताक घेणं अधिक फायदेशीर ठरतं.

# अपुऱ्या झोपेमुळे स्मरणशक्तीवर परिणाम - डॉ.जगदीश टेकाळे

बीड : दैनंदिन सवयी नकळतपणे आपल्या मेंदूला वेगाने वृद्ध करत आहेत, इतकेच नाही तर त्याचा आकारही कमी करत आहेत, असे एका अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. अपुरी झोप, वाढलेला ताण आणि उच्च रक्तातील साखर यांचा आपल्या स्मरणशक्ती आणि एकाग्रतेवर थेट परिणाम होत आहे.

झोपेच्या कमतरतेमुळे मेंदूतील ग्रे मॅटरचे प्रमाण कमी होते आणि हिप्पोकॅम्पस आकुंचन पावतो. याव्यतिरिक्त, झोपेच्या कमतरतेमुळे मेंदू बीटा-अमायलॉइडसारखा विषारी कचरा साफ करू शकत नाही, जो मेंदूत जमा होतो आणि त्यामुळे स्मरणशक्ती कमी होते, असे कोलंबिया विद्यापीठाने केलेल्या संशोधनातून दिसून आले आहे.सततच्या ताणामुळे कॉर्टिसोलची पातळी वाढते, जे थेट हिप्पोकॅम्पस (मेंदूतील अवयव) आणि प्रीफ्रंटल कॉर्टेक्सवर (मेंदूच्या पुढच्या भागात, कपाळाच्या मागे असलेला एक अत्यंत महत्त्वाचा भाग) हल्ला करतात. कालांतराने, या तणावामुळे एकाग्रता कमी होते, निर्णयक्षमता बिघडते आणि मेंदूतील दाह वाढतो. जर तणाव दीर्घकाळ टिकून राहिला, तर त्यामुळे चेतासंकेतांमध्येही व्यत्यय येऊ शकतो.रक्तातील साखरेचे प्रमाण वाढणे हे केवळ शरीरासाठीच नव्हे, तर मेंदूसाठीही धोकादायक आहे. रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने मेंदूचा आकार कमी होतो आणि लहान रक्तवाहिन्यांना नुकसान पोहोचते. या स्थितीमुळे मेंदूमध्ये ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस निर्माण होतो, ज्यामुळे विचार करण्याच्या क्षमतेत अकाली घट होते.

निरोगी मेंदू टिकवून ठेवण्यासाठी योग्य पोषक तत्त्वे आवश्यक आहेत. ओमेगा-३ फॅटी सिड मेंदूच्या पेशींचे पडदे मजबूत करण्यास आणि दाह कमी करण्यास मदत करतात, ज्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. क्रिएटिन मेंदूच्या चयापचय क्रियेला आधार देते, ज्यामुळे तणाव किंवा थकवा असतानाही मेंदूचे आरोग्य टिकवून ठेवण्यास मदत होते, ङ्ग असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.



**डॉ.जगदीश टेकाळे**
मो. 9518551503
मो. 9545615352

# ५ वर्षांखालील मुलांसाठी योग्य आहार काय असावा?

५ वर्षांखालील मुलांची शारीरिक आणि मानसिक वाढ अत्यंत वेगाने होत असते, त्यामुळे त्यांच्या आहारात वैविध्य आणि पोषक तत्वे असणे खूप महत्त्वाचे आहे. खालीलप्रमाणे मुलांच्या आहाराचे नियोजन तुम्ही करू शकता:

**१. ऊर्जेसाठी कर्बोदके:** मुले खूप सक्रिय असतात, त्यामुळे त्यांना पुरेशी ऊर्जा मिळणे आवश्यक आहे. काय द्यावे: चपाती, भात, ज्वारी-बाजरीची भाकरी, नाचणीचे सत्व किंवा लाडू, आणि ओट्स. फायदा: यामुळे दिवसभर खेळण्यासाठी आणि शिकण्यासाठी त्यांना शक्ती मिळते.

**२. वाढीसाठी प्रथिने:** स्नायूंच्या बांधणीसाठी आणि वाढीसाठी प्रथिनांची गरज असते.

काय द्यावे: मूग, तूर, मटकी यांसारखी कडधान्ये, डाळींचे वरण, अंडी, पनीर, आणि सोयाबीन.

प्रमाण: दिवसातून किमान दोन वेळा



प्रथिनांचा समावेश आहारात असावा.

**३. हाडांच्या मजबुतीसाठी कॅल्शियम आणि दुग्धजन्य पदार्थ:** काय द्यावे: दूध, दही, ताक, आणि चीज.

महत्त्वाचे: जर मूल दूध पिण्यास कंटाळा करत असेल, तर त्याला दह्याची कोशिंबीर किंवा दुधाची खीर करून द्यावी.

**४. जीवनसत्वे आणि खनिजे:** फळे: केळी, सफरचंद, पपई, आणि चिकू ही फळे मुलांसाठी उत्तम आहेत. शक्यतो फळांचा रस देण्यापेक्षा फळ चिरून खायला द्यावे, जेणेकरून त्यांना फायबर (तंतूमय पदार्थ) मिळतील. भाज्या: पालेभाज्या (पालक, मेथी) आणि फळभाज्यांचा (गाजर, भोपळा) समावेश करा. भाज्यांच्या पराठ्यामुळे मुले आवडीने खातात.

**५. महत्त्वाचे 'डाएट' नियम:** थोड्या थोड्या वेळाने खाणे: मुलांचे पोट लहान असते, त्यामुळे त्यांना एकाच वेळी भरपेट खाऊ घालण्यापेक्षा दिवसातून ५-६ वेळा थोडे थोडे खाऊ द्या.

**पाणी: दिवसभरात पुरेसे पाणी पिण्याची सवय लावा.**

साखर आणि मीठ टाळा: ५ वर्षांखालील मुलांना जास्त साखर (चॉकलेट, कोल्ड ड्रिंक्स) आणि जास्त मीठ (चिप्स, कुरकुरे) देणं टाळावे.आकर्षक मांडणी: मुलांना रंगीत गोष्टी आवडतात. त्यामुळे ताटात वेगवेगळ्या रंगांच्या भाज्या आणि फळे सजवून दिल्यास ते आवडीने खातात. टीप: जर मुलाला एखाद्या विशिष्ट पदार्थाची लर्जी असेल किंवा त्याचे वजन वाढत नसेल, तर एकदा बालरोगतज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्या.

बुधवार दिनांक १५ एप्रिल २०२६

बीड **सरकार**

पान 3

## विशेष वृत्त

# बीडमध्ये होणार राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन


**गेवराई (प्रतिनिधी):** यावर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहावरून १ ते ५ मे दरम्यान बीड येथे भव्य राज्यस्तरीय 'किसान कृषी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड) बीड येथील विस्तीर्ण मैदानावर ५ दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक व कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. किसान कृषी विकास प्रतिष्ठान गेल्या १८ वर्षांपासून कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी प्रदर्शनांचे आयोजन करत आहे. गेवराई, जालना, परभणी, हिंगोली यांसह अनेक ठिकाणी झालेल्या या प्रदर्शनांना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहानुसार यंदा बीड येथे या कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन तसेच ओंकार साखर कारखाना समूह यांचा विशेष सहभाग राहणार आहे.

# वक्तृत्व स्पर्धेत रिया ओव्हाळ प्रथम



**बीड (प्रतिनिधी):** शहरातील बार्शी नाका परिसरात असलेल्या प्रकाश आंबेडकर नगरामध्ये विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या वकृत्व स्पर्धेत रिया उत्तम ओव्हाळ हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त प्रकाश आंबेडकर नगर येथील जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कुणाल पायाळ व उपाध्यक्ष कामेश धन्वे व कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये दि.१२ एप्रिल रोजी विश्वरत्न परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक रिया उत्तम ओव्हाळ हीने पटकवले. तिला स्मृतीचिन्ह देऊन तिचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक शितल चक्रे व प्रीतम चक्रे, डॉ. जगदीश वाघमारे, विशाखा वाघमारे यांनी रिया उत्तम ओव्हाळ हीचा ट्रॉफी देऊन सन्मान केला. यावेळी गौतम ओव्हाळ, राहुल जावळे, गोरक काळे, विलास चक्रे, संतोष अहिरे, धनंजय आगलावे, मयूर वीर, बौद्ध उपासिका व उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीना प्रकल्पाच्या कालव्यातून सिंचनासाठी सोडले पाणी



**आष्टी (प्रतिनिधी):** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नावर आ. सुरेश धस यांनी पत्राद्वारे मागणी करताच पाठपुराव्याला यश मिळाले असून, सीना प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. आ. सुरेश धस यांनी कुकडी पाटबंधारे विभाग क्र. २, श्रीगोंदा येथील कार्यकारी अभियंत्यांना पत्राद्वारे आष्टी तालुक्यातील सीना प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील पिंपरी (घुमरी), कानडी बुद्रुक आणि वाकी या तीन बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवून शेती सिंचनासाठी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली प्रत्यक्ष उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आल्याने लाभ क्षेत्रातील पिकांना मोठा आधार मिळणार असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. याबाबत आ. सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. भविष्यातही त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे.

# भिक्षा कार्यक्रमानिमित्त खांडे पारगाव येथे मिरवणूक



**बीड (प्रतिनिधी):** गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांची दोन धाम यात्रा पूर्ण केल्याबद्दल व खांडे पारगाव येथे भिक्षा कार्यक्रमानिमित्त भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. खांडे पारगाव फाटा येथे गुरुवर्य शांती ब्रह्मा नवनाथ बाबा महाराज यांची रथा मधून वाजवत गाजवत तसेच महिलांनी आपापल्या दारामध्ये सडा रांगोळी करत नवनाथ बाबा यांचे अवक्षण करून मिरवणूक काढण्यात आले. गावामधील लहान मुलं मुली शाळकरी विद्यार्थी विद्यार्थिनी तरुण युवक युवती महिला मंडळी व पुरुष मंडळी गावातील लहान थोरांपासून सर्व मंडळींनी खांडे पारगाव फाटा येथे जमून गुरुवर्य नवनाथ बाबा यांचे जंगी स्वागत करण्यात आले शाळकरी मुलांनी नेहरू व टाळ असा पोशाख करत व मुलींनी साडी नेसून कळस नारळ डोक्यावर घेऊन भव्य दिव्य अशी वाजवत गाजवत मिरवणूक काढण्यात आली. खांडे पारगाव येथील ग्रामस्थांनी डीजे च्या अवाजवी खर्चाला फाटा देत गावातील शाळकरी विद्यार्थ्यांना गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते शालेय साहित्य रजिस्टर सोबत इतर साहित्य वाटप करण्यात आले.

# जनगणना करताना ओबीसीची पण जनगणना करा - प्रा. सुशीलाताई मोराळे




**बीड (प्रतिनिधी):-** भारत सरकारने विरोधी पक्ष नेता राहुल गांधींच्या वारंवार सभागृहातील मागणीचा विचार करून जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. ही जनगणना करण्यासाठी शासनाकडून पूर्ण तयारी करण्यात आली आहे. ३३ मुद्यांची माहिती बीएलओना भरावी लागणार आहे. परंतु दुर्दैव असे की, १९३१ च्या इंग्रज सरकारने केलेल्या जनगणनेत ओबीसी ची जनगणना झाली होती तेव्हा देशाच्या लोकसंख्येत ५२% ओबीसी असल्याचा अहवाल समोर आला होता. १९४७ ला देश स्वतंत्र झाला त्यानंतर १९५१ ते २०११ पर्यंत देशाने जनगणना केली असली तरी ओचीसींना मोजले गेले नाही. २०११ नंतर २०२१ ला जनगणना होणे अपेक्षित होते परंतु कोविडचे संकटाचे कारण पुढे केले गेले आणि २०२६ एप्रिल पासून ही जनगणना होणार आहे. मात्र त्यात ओचीसी जनगणना होणार नसल्याचे सिद्ध झाले आहे. सरकार ओबीसींना का घेत आहे हे समजू शकलेले नाही. ही जनगणना ओबीसी सहित करावी अशी मागणी ओबीसी बचाव संघर्ष समितीच्या वतीने आपण माननीय प्रधानमंत्री भारत सरकार यांना करीत आहोत. आज दिनांक १३ एप्रिल रोजी माननीय जिल्हाधिकारी बीड यांच्या कार्यालयासमोर एक दिवसीय घरणे आंदोलन करण्यात आले त्या प्रसंगी जिल्हयातील ओबीसी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धरणे आंदोलन

७ ऑगस्ट १९९० देशातील जनता दलाच्या सरकार व मित्र पक्षाच्या सरकारने देशातील ५२ टक्के ओबीसींना नोकरी आणि शिक्षण क्षेत्रात सत्तावीस टक्के आरक्षण जाहीर केले. ओबीसी जनगणना व्हावी म्हणून २ ऑक्टोंबर २०१३ पर्यंत हो जनगणना करू या मागणीसाठी ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने पाच लाख सहह्यांचे निवेदन माननीय प्रधानमंत्री यांना देण्यात आले दिनांक ९ ऑगस्ट ते २ ऑक्टोंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात त हे अभियान संघटनेने राबवले होते. २ ऑक्टोंबर २०११ रोजी देशाच्या संसदेत ओबीसी जनगणनेचा ठरावही मनमोहन सिंग सरकारने पारित केला होता. त्यापूर्वी १९९६ मध्ये देवेगौडा यांच्या नेतृत्वातील जनता दल सरकारने ओबीसी जनगणनेचा ठराव घेतला होता परंतु त्यांचे सरकार पाडण्यात आले आणि हा प्रश्न प्रलंबित राहिला दर दहा वर्षांनी जनगणना व्हायला पाहिजे कारण देशाचे बजेटचे नियोजन करण्यासाठी जनगणना आवश्यक असते. तब्बल १६ वर्षांनी ही जनगणना होत आहे २०११ च्या जनगणने देशाची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षा जास्त होती त्याच आकड्यानुसार देशाचे बजेट दरवर्षी केले जात आहे. कदाचित हा आकडा आता १५० कोटी होईल वाढत्या लोकसंख्येसाठी पाणी, आरोग्य, शिक्षणाच्या सुविधा त्या प्रमाणात करणे गरजेचे असते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची जनगणना होते. त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटची तरतूदही केली जाते मात्र ओबीसीचा नक्की आकडा नसल्यामुळे प्लॅनिंग मध्ये त्यांना स्थान नाही. आजचे केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांनाही प्रचंड संख्येने मतदान ओबीसी देतात मात्र ओबीसीची जनगणना करायला सरकार तयार नाही. केंद्रात २७ मंत्र्यांसह प्रधानमंत्री मोदी जी ओढून ताणून का होईना ओबीसी आहेत पण उपयोग काय मराठीचा दांडा गोतास काळ असतो. त्या म्हणीप्रमाणे मोदीजी ओबीसी आहेत पण ते मजबूर प्रधानमंत्री आहेत. जोपर्यंत नागपूर संघाचे त्यांचे आक्का त्यांना ओबीसी जनगणना करायला परवानगी देत नाहीत तोपर्यंत मोदीजी मजबूर आहेत. झोपेचे सोंग घेतलेला ओबीसी जनसमुदाय मात्र वाबाबत अनभिज्ञ आहे. १९९० ला ३७४३ जाती देशात ओबीसी प्रवर्गात होत्या महाराष्ट्रात ही संख्या २७२ इतकी होती त्यानंतर मंडल आयोगाकडून मोजायच्या राहिलेल्या जाती

जागा झाल्या आता संपूर्ण देशात ही संख्या किमान ४५०० इतकी झाली असणार आहे. राज्यात ३५० पेक्षा जास्त ही संख्या आज तारखेला आहे. मराठा समाजातील, जाती फोड जाती कुणबी यांचाही नव्याने समावेश ओबीसी प्रवर्गात झाला आहे. मी जरांगे पाटील साहेबांना नम्र आवाहन करते की केवळ ओबीसी प्रवर्गात समाविष्ट होऊन चालणार नाही त्यासाठी ओबीसीची जनगणना होणे गरजेचे आहे आपण या लढ्याचे नेतृत्व करावे अशी विनंती आम्ही ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने आपणास करीत आहोत, या प्रसंगी श्री कल्याण काका आखाडे, एंड सुभाष राऊत, बापूराव भालेकर, देविदास चव्हाण, डॉक्टर संजय तांदळे, प्रा. भगवान माने, प्रा. लक्ष्मण गंजाळ, मीनाक्षी देवकते, अर्जुन दळे, विशाल राऊत, प्रा. बाळासाहेब मतकर, गणेश जगताप, राजेंद्र दराडे, रवी बांगर, संतोष काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# बालनाट्य-किर्तन कार्यशाळा मुलांच्या व्यक्तिमत्व विकासास पोषक: डॉ. चिंधे

**बीड (प्रतिनिधी):** वर्तमान काळात शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात असणे गरजेचे असून यासोबतच त्यांच्यामध्ये नैतिक मूल्य रूजवणे आवश्यक बनले आहे. या पाचदिवसीय कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना नाट्यकौशल्य व नैतिक मूल्ये व संतविचारांचा परिचय होऊन त्यांचा व्यक्तिमत्व विकास साधला जाईल, असे प्रतिपादन बलभीम महाविद्यालयाचे

आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. अनिल चिंधे यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग व श्री. विज्ञानेश्वर सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे शिदोड येथे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात पाचदिवसीय बालनाट्य-किर्तन व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. असून या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभदि.१३ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. अनिल चिंधे बोलत होते. मंचावर उद्घाटक म्हणून श्री. संत जांबुवंत कृपा आध्यात्मिक गुरूकुलचे संस्थापक ह.भ.प.आकाश महाराज म्हस्के, प्रमुख पाहुणे श्री. विज्ञानेश्वर सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. कृष्णा महाराज वेताळ तर प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे होते. आपल्या उद्घाटकीय मार्गदर्शनात ह.भ.प. आकाश महाराज म्हस्के म्हणाले, या कार्यशाळेच्या माध्यमातून मुलांना शास्त्रोक्त ज्ञान मिळणार असून त्यांच्यातील कौशल्यांचा विकास होण्यास मदत होणार आहे. याप्रसंगी ह.भ.प.कृष्णा महाराज वेताळ म्हणाले, या पाच दिवसीय कार्यशाळेतून मुले आवश्यक ते विविध ज्ञान संपादनासोबतच नाट्य कौशल्य व नितीमूल्ये शिकतील ज्यातून ातून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास मदत मिळेल. समारंभाच्या सुरूवातीस सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका मांडली. या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. केशव भागवत यांनी केले तर आभार प्रा. प्रविण निसर्गंध यांनी मानले.

# फुले-आंबेडकर अनुबंधातूनच समृद्ध भारताची निर्मिती-उपायुक्त रवींद्र जोगदंड





**बीड (प्रतिनिधी):-** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडलेला सामाजिक समतेचा विचार आणि त्या विचारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला भक्कम संवैधानिक आधार, याच वैचारिक अनुबंधातून आजच्या समृद्ध भारताची निर्मिती झाली आहे. १९४७ पासून २०२६ पर्यंतच्या भारताच्या महासत्तेकडील प्रवासात भारतीय संविधानाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा. रवींद्र जोगदंड यांनी केले.

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि.११ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. 'क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुबंध' या विषयावर त्यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा. प्रदीप रोडे होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीडचे सहाय्यक उपायुक्त मा.उमेश सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक मा.डी. बी. क्षिरसागर, माजी प्राचार्य मा.डॉ. कमलाकर कांबळे, उपशिक्षणाधिकारी मा. भगवान सोनवणे, तसेच मा.दीपा रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात जोगदंड यांनी फुले व आंबेडकर यांच्या

विचारांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजात समता, शिक्षण आणि स्त्री-मुक्तीचा जो पाया रचला, त्या विचारांना डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून संस्थात्मक व कायदेशीर बळ दिले. मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण हाच एकमेव प्रभावी मार्ग असून शाह-फुले-आंबेडकर विचारधारा ही परस्परांशी घट्ट जोडलेली आहे. हीच विचारधारा आजच्या पिढीने वारसा म्हणून पुढे नेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्यानंतर भारताने साधलेली प्रगती ही भारतीय संविधानामुळेच शक्य झाली आहे. आज भारत महासत्तेकडे वाटचाल करत असून या प्रवासामागे राज्यघटनेचे मोठे योगदान आहे. या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, हे विसरता कामा नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, फक्त कार्यक्रम आयोजित करून थांबायचे नाही, तर त्यातून स्वतःला घडवणे आवश्यक आहे. आयुष्यात यश मिळवायचे असेल, तर स्वतःप्रति प्रामाणिक राहन वेळेचे महत्त्व ओळखून सातत्याने अभ्यास करणे गरजेचे आहे, असा प्रेरणादायी संदेश दिला. तसेच यावेळी त्यांनी जूनपासून स्टुडंट ऑफ द इयर उपक्रम सुरू करण्यासह प्रत्येक रविवारी अभ्यास उपक्रम राबविण्याचा निर्णय जाहीर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमास तुलसी समूहातील विविध शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय कर्मचारी, शिक्षकांचा २१ एप्रिलपासून बेमुदत संप

**बीड (प्रतिनिधी):** जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसह विधानसभेच्या पटलावर मान्य केलेल्या मागण्यांच्या पुर्ततेचा सरकारला विसर पडला आहे. त्यामुळे राज्यातील सतरा लाख संतप्त राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाणार आहेत. जिल्ह्यातील कर्मचारी शिक्षकांनी संप यशस्वी करावा असे आवाहन राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने केले आहे.

याबाबत समन्वय समितीने म्हटले आहे की, पेंन्शनसाठी मार्च २०२३ मधे

संप यशस्वी करण्याचे बीड जिल्हा समन्वय समिती आवाहन !

सात दिवसांचा अभूतपूर्व संप राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांनी घडवून आणला. परिणामी जुन्या पेंन्शन योजने प्रमाणे कर्मचाऱ्याच्या 'सामाजिक' व 'आर्थिक' सुरक्षा देणारी 'पेन्शन योजना' लागू करण्याचे राज्य सरकारने मान्य केले. त्यासाठी सुबोधकुमार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. या समितीचा अहवाल स्वीकारून पेंन्शन लागू करण्यासाठी पुनश्च १४ डिसेंबर २०२३ रोजी संप करावा लागला तेंव्हा अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू

करण्याचे आश्वासन सरकारने दिले. परंतु त्याबाबत सरकारकडून चालढकल सुरू होती, त्यामुळे २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला तेंव्हा कुठे जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना स्वीकारण्यात आली. या योजनेच्या नियम, अटी नंतर लागू करण्याचे अभिवचन देण्यात आले. परंतु ते अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे रिक्त जागा भराव्यात, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांना १०-२०-३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, विनाअनुदानित वा अंशतः अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे, १० वर्षे सतत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात या व इतर मागण्यांसाठी होत असलेल्या या संपात जिल्ह्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे आवाहन समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा बडे, सरचिटणीस रामचंद्र ठोसर, निमंत्रक राजकुमार कदम, बळीराम आण्णा उबाळे,

गजानन जाधव, परमेश्वर राख, राजेंद्र खेडकर, एस. पी. जगताप, महादेव चौरे, महेश काळे, पुरूषोत्तम आंधळे, विकास मुळे, डी. डी. खामकर, शिला मुंडे, मधुकर शेळके, राहुल धोंगडे, राजेंद्र औसरमल, सखाराम काशिद, डी. जी. तांदळे, राजकुमार साठे, संदीप धस, कालिदास धपाटे, गणेश आजबे, बाळासाहेब शिंदे, वैभव बेदरे, श्रीमती रेखा बांगर, रामराव फड, मंगेश सुरवसे, किशोर बिरलिंगे, योगेश कुलकर्णी, अरबाज पठाण, भरत नागरगोजे, उद्धव बनसोडे, शब्बीर पठाण, राम पांचाळ, महेश सातपुते, एस. आर. बागुल, नवनाथ आनेराव, वंदना विघ्ने, गोदावरी नागरगोजे यांनी केले आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगासाठी ज्ञानाचे प्रतीक त्यांचे विचार जगाला प्रेरणा देत राहतील-आ.धनंजय मुंडे

## शहरातील ठिकठिकाणच्या भीमजयंती कार्यक्रमांना दिल्या भेटी








परळी (सरकार): देशाचे संविधानकर्ते, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचा अथांग सागर होते. ते केवळ एका समाजाचे नाही तर संपूर्ण जगासाठी ते ज्ञानाचे प्रतीक आहेत. महामानवाचे कर्तृत्व आणि विचार हे आपल्या सर्वांना प्रेरणा देणारे आणि प्रगतीकडे घेऊन जाणारे आहेत. देशाला स्वातंत्र्य आणि समतेचा जो महान संदेश त्यांनी दिला तोच संदेश आजही समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे काम करत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी देखील बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा आपल्या कृतीत आणायला हवा, असे आवाहन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त परळी वैद्यनाथ शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास धनंजय मुंडे यांनी सहकाऱ्यांच्या समवेत पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा देताना धनंजय मुंडे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून देशवासी यांना भीम जयंतीच्या शुभेच्छा देत मोलाचा संदेश दिला आहे.

तद्नंतर धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील भीम नगर, जगतकर गल्ली, रोडे गल्ली, साठेनगर, इंदिरानगर, भीमा नगर, मिलिंद नगर, उकळवेस, नागसेन नगर इत्यादी ठिकाणच्या बुद्ध विहार व ठिकठिकाणी आयोजित भीम जयंती कार्यक्रमानिमित्त भेटी देऊन महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत ठीक ठिकाणी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण केले.

धनंजय मुंडे यांच्या हस्ते आजच्या शुभमुहूर्तावर मिलिंद नगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य नालंदा बुद्ध विहाराचे यावेळी लोकार्पण देखील करण्यात आले, यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. डॉ. विनोद जगतकर, रवींद्र गित्ते, श्रीकृष्ण कराड, अनंत झंगळे, यांसह नगरसेवक, पदाधिकारी आदी उपस्थित होते

## डॉ.बाबासाहेबांचे जिवन आजच्या पिढीस प्रेरणादायी-प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर

बीड (सरकार): दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब हे केवळ भारताचे तत्वव्यक्ते नसून ते जागतिक दर्जाचे विचारवंत आहेत. डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक विषयामध्ये मोठया प्रमाणात लेखन करुन मार्गदर्शक ग्रंथ संपदा निर्माण केली आहे. हजारो वर्ष ज्या समाजाला संधी नव्हती अशा समाजला मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम त्यांनी केले आहे. बाबासाहेबांच्या कार्यातून आजच्या युवकांनी प्रेरणा घेऊन सामाजिक, शैक्षणिक व राजकीय जिवनात कार्य केले पाहिजे.




यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे भारतातील स्त्री व दलीत पिढीत यांचा उध्दार झाला आहे. बाबासाहेबांचे कार्य इतके मोठे आहे की. ते ज्या कोलंबीया विद्यापीठात शिकले त्या विद्यापीठाने देखील डॉ. बाबासाहेबांना सिम्बॉल ऑफ नॉलेज असे संबोधन देऊन गौरविले आहे.

## सतरा लाख सरकारी कर्मचारी शिक्षकांचा २१ एप्रिल पासून बेमुदत संप!

बीड (सरकार): जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसह विधानसभेच्या पटलावर मान्य केलेल्या मागण्यांच्या पुर्ततेचा सरकारला विसर पडला आहे. त्यामुळे राज्यातील सतरा लाख संतप्त राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाणार आहेत. जिल्ह्यातील कर्मचारी शिक्षकांनी संप यशस्वी करावा असे आवाहन राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने केले आहे.

याबाबत समन्वय समितीने दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की,पेंन्शनसाठी मार्च २०२३ मधे सात दिवसांचा अभूतपूर्व संप राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांनी घडवून आणला. परिणामी जुन्या पेंन्शन योजने प्रमाणे कर्मचार्याच्या 'सामाजिक' व 'आर्थिक' सुरक्षा देणारी 'पेन्शन योजना' लागू करण्याचे राज्य सरकारने मान्य केले. त्यासाठी सुबोधकुमार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. या समितीचा अहवाल स्वीकारून पेंन्शन लागू करण्यासाठी पुनश्च १४ डिसेंबर २०२३ रोजी संप करावा लागला तेंव्हा अर्थसंकल्पीय अधिवेशनात सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचे आश्वासन सरकारने दिले. परंतु त्याबाबत सरकारकडून चालढकल सुरू होती, त्यामुळे २९ ऑगस्ट पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला तेंव्हा कुठे जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना स्वीकारण्यात आली. या योजनेच्या नियम, अटी नंतर लागू करण्याचे अभिवचन देण्यात आले. परंतु ते अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. त्याप्रमाणे रिक्त जागा भराव्यात, ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त अंशत: अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांना १०-२०-३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, विनाअनुदानित वा अंशत; अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार शंभर टक्के अनुदान देण्यात यावे, १० वर्षे सतत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचार्यांच्या सेवा नियमित कराव्यात या व इतर मागण्यांसाठी होत असलेल्या या संपात जिल्ह्यातील सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे आवाहन समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा बडे, सरचिटणीस रामचंद्र ठोसर, निमंत्रक राजकुमार कदम, बळीराम आण्णा उबाळे, गजानन जाधव, परमेश्वर राख, राजेंद्र खेडकर, एस. पी. जगताप, महादेव चौरे, महेश काळे, पुरूषोत्तम आंधळे, विकास मुळे, डी. डी. खामकर, श्रीमती शिला मुंडे, मधुकर शेळके, राहुल धोंगडे, राजेंद्र औसरमल, सखाराम काशिद, डी. जी. तांदळे, राजकुमार साठे, संदीप धस, कालिदास धपाटे, गणेश आजबे, बाळासाहेब शिंदे, वैभव बेदरे,श्रीमती रेखा बांगर, रामराव फड, मंगेश सुरवसे, किशोर बिरलिंगे, योगेश कुलकर्णी, अरबाज पठाण, भरत नागरगोजे, उद्धव बनसोडे, शब्बीर पठाण, राम पांचाळ, महेश सातपुते, एस. आर. बागुल, नवनाथ आनेराव, श्रीमती वंदना विघ्ने, श्रीमती गोदावरी नागरगोजे, श्रीमती हेमलता परचाके, श्रीमती राजश्री आचार्य, श्रीमती पुष्पा चक्रे यांनी केले आहे.

## ज्येष्ठ शिक्षक व पत्रकार मधुकर सरपते यांचे निधन

बीड (सरकार): मादळमोही :येथील रहिवासी तसेच ज्येष्ठ शिक्षक व पत्रकार मधुकर अप्पाराव सरपते यांचे दिनांक १५ एप्रिल २०२६, वार बुधवार रोजी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच मादळमोहीसह परिसरात शोककळा पसरली असून विविध स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



मधुकर सरपते यांनी जय भवानी शिक्षक प्रसारक मंडळ, गेवराई येथे शिक्षक म्हणून दीर्घकाळ प्रामाणिक व निष्ठेने सेवा बजावली. शिक्षक म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी पत्रकारितेतही सक्रिय भूमिका निभावत समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांच्या लेखणीतून सर्वसामान्यांच्या समस्या मांडल्या जात असून सामाजिक जाणीवा जागृत करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

शिक्षण क्षेत्रात त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांना घडवून त्यांना योग्य दिशा दिली. त्यांचा साधेपणा, संयमी स्वभाव आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यामुळे त्यांना समाजात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्यांच्या निधनामुळे एक कर्तव्यदक्ष शिक्षक, सजग पत्रकार व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

## किल्ले धारूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नगरपरिषद कर्मचारी संघटनेतर्फे अल्पउपहार वाटप

किल्ले धारूर (सरकार) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नगरपरिषद कर्मचारी संघटनेतर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी नगरपरिषद कर्मचार्यांनी सर्वप्रथम नगरपरिषद कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केली. त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच त्यांच्या विचारांचा जागर केला.

त्यानंतर सर्व कर्मचारी ग्रामीण रुग्णालय किल्ले धारूर येथे दाखल झाले. येथे वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयातील कर्मचार्यांच्या उपस्थितीत डॉ. आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी रुग्णालयातील रुग्ण तसेच कर्मचारी वर्ग यांना अल्पउपहार वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या वेळी नगरपरिषद मधील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपत जयंती साजरी करण्याचा आदर्श नगरपरिषद कर्मचारी संघटनेने निर्माण केला आहे.



**बीड : महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरातील पेठ बीड परिसरातील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## अशोक मा.व उच्च.मा.विद्यालयात डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात

वडवणी (सरकार): तालुक्यातील चिंचाळा येथील अशोक माध्यमिक विद्यालय मध्ये, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रा.सर्जेराव काळे सर , शाळेचे मुख्याध्यापक श्री सावंत सर हे पण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमात अध्यक्ष प्रा. काळे सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्यघटने विषयी केलेले कार्य याविषयी माहिती सांगितली तसेच प्राचार्य श्री सावंत सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहिती सर्व विद्यार्थ्यांना दिली.




कार्यक्रमाला उपस्थित शाळेतील सर्व शिक्षक , शिक्षिका ,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी सर्व उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आवारे सर यांनी केले व कार्यक्रम ,आभार प्रदर्शन श्री कोळपे सर यांनी केले कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक प्रमुख श्रीमती सावंत मॅडम यांनी केले.

## माजलगाव शहरात भीम जन सागर उसळला,भीम घोषणे शहर दणाणले

माजलगाव (सरकार): १४ एप्रिल डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंयती दिन माजलगाव शहरात महामानवला अभिवादन करण्यासाठी भीम जन सागर उसळेच्या चित्र दिसून आले

भीम अनुयायींनी संघटीत होणे ही काळाची गरज असून संघटीत व्हावे असा असे आहे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी श्रावस्ती बुध्द विहार येथे केले तर बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराजी पोटभरे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डॉल्बी च्या आवाजात साजरी करा असे सांगितले तर याच कार्यक्रमात अगदी १० वर्षांच्या स्नेहा सावळे हीने आपल्या कडक भाषणात बाबासाहेब आंबेडकर कोण आहेत हे पटवून देत बुध्द विहार आपल्या भाषण शैलीने गाजवुन उपस्थितांचे मन जिंकले

सद् धम्म सेवा संघाच्या वतीने येथील श्रावस्ती बुध्द विहार येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्यात आला होता तर शहरा मध्ये प्रत्येक भागात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी भीम सागर उसळला होता लहान थोर पासून महिला पुरुष ही जयंती मिरवणुकीत सहभागी झाले अनेक संस्थांनी पाणी, अल्प उपहार देवून अभिवादन केले

श्रावस्ती बुध्द विहार येथे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते पंचशिल झेंडयाचे ध्वजारोहण करण्यात आले या वेळी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराजी पोटभरे,कचरू तात्या खळगे, पत्रकार तुकाराम येवले,मराठा सेवा संघाचे प्रा.अर्जून तनपुरे, पुरुषोत्तम जाधव,श्रीहारी मोरे नाना, नवनाथ धाईजे,यादी उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष सद् धम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव, दशरथ मकासरे, भगवान सातपुते,मळीबा चांदमारे,जी एन घनघाव, नवनाथ शिनगारे, पांडुरंग जाधव ऍड रविकांत उघडे, पत्रकार तानाजी सिरसट, सुदर्शन स्वामी, सुहास बोराडे, यावेळी पुरुषोत्तम जाधव सर लिखीत शेतकरी,डॉ.बाबासाहेब या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती GVT कृषीकुल येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे ट्रस्टी संजय परमार यांनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करत आपल्या भावना व्यक्त केल्या.

## सारूळ शिवारातून पाणबुडी मोटार,स्टार्टर, वायर लंपास

केज (सरकार): अज्ञात चोरट्यांनी विहिरीवरील पाणबुडी मोटार, स्टार्टर, केबल वायर असा २४ हजार पाचशे रूपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना सारूळ(ता.केज) शिवारात घडली. याप्रकरणी चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. सारूळ(ता.केज) येथील शेतकरी राजासाहेब मनोहर ढाकणे यांची शिवारात जमीन असून त्यांचे वडील मनोहर ढाकणे यांच्या नावे तीन वर्षांपूर्वी शासनाच्या योजनेतून त्यांना स्टार्टर, सोलारच्या प्लेट मिळाल्या होत्या. त्यांनी विहिरीजवळ हा सोलार प्लँट बसवून पाच एचपीची पाणबुडी मोटार विहिरीत बसविली होती. २९ मार्च रोजी विहिरीतील पाणी बाजरीच्या पिकाला दिल्यानंतर दुपारी चार वाजता मोटार बंद करून आले. त्यानंतर अज्ञात चोरट्यांनी विहिरीतील १५ हजार रूपये किंमतीची पाणबुडी मोटार, ७ हजार रूपये किंमतीचे केबल वायर, अडीच हजार रूपये किंमतीचे स्टार्टर असा २४ हजार पाचशे रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे उघडकीस आले. शेतकरी राजासाहेब ढाकणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार राजू वंजारे हे करीत आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९

(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779

(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)